www.xtrapapers.com

M11/1/A1MAR/SP1/MAR/TZ0/XX

22110195

International Baccalaureate®
Baccalauréat International
Bachillerato Internacional

**MARATHI A1 – STANDARD LEVEL – PAPER 1**
**MARATHE A1 – NIVEAU MOYEN – ÉPREUVE 1**
**MARATHI A1 – NIVEL MEDIO – PRUEBA 1**

Wednesday 11 May 2011 (morning)
Mercredi 11 mai 2011 (matin)
Miércoles 11 de mayo de 2011 (mañana)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

---

INSTRUCTIONS TO CANDIDATES

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a commentary on one passage only. It is not compulsory for you to respond directly to the guiding questions provided. However, you may use them if you wish.

INSTRUCTIONS DESTINÉES AUX CANDIDATS

- N'ouvrez pas cette épreuve avant d'y être autorisé(e).
- Rédigez un commentaire sur un seul des passages. Le commentaire ne doit pas nécessairement répondre aux questions d'orientation fournies. Vous pouvez toutefois les utiliser si vous le désirez.

INSTRUCCIONES PARA LOS ALUMNOS

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un comentario sobre un solo fragmento. No es obligatorio responder directamente a las preguntas que se ofrecen a modo de guía. Sin embargo, puede usarlas si lo desea.


© International Baccalaureate Organization 2011

www.xtrapapers.com



*पुढीलपैकी **एका** उता-याचे रसग्रहण करा.*

**1.**

अशा प्रकारे गडबडगोंधळाला पूर्ण वाव देणारे गीत मुक्रर होऊन तालमी सुरू झाल्या. आम्ही बाराचौदा पोरांनी या गीताचा नुसता गलका उडवून दिला. पण ऐन सरस्वती-पूजनाच्या दिवशी मात्र इतका काही गलका झाला की अमृते मास्तर अगदी हर्षोन्मादाने नाचले. आमची शाळा ती केवढी आणि त्यात स्टेज ते केवढे! दोन्ही बाजूंना जास्तीत जास्त पडदे खेचूनसुद्धा कशीबशी पाचसहा पोरे आपली तोंडे स्टेजवर दाखवू शकली. बाकीची पोरे भान हरपून पडद्यामागेच नाचत होती. घरी गेल्यावर तू कुठे दिसला नाहीस तो? – असा प्रश्न पालकांनी विचारल्यावर आपण पडद्यामागेच नाचलो हे अनेक पोरांच्या ध्यानी आले!

या गीतात वास्तवतेचा रंग भरावा म्हणून आम्ही सा-या पोरांनी पंचे नेसून आणि बंड्या घालून शेतक-याचा पोशाख केला होता. प्रत्येकाने आपापल्या घरचे विळे आणले होते. बोलून चालून भाताचाच हंगाम!

एवढ्याशा स्टेजवर आधीच दाटीवाटीने उभी राहिलेली आम्ही पोरे. पडदा बाजूला सरकताच आम्ही थरकाप घाबरलो. पण पडद्यामागून "देवाजीने करुणा केली –" अशी बागाईतकर मास्तरांनी प्रत्यक्ष देवाजीच्या अंगावर काटा आणणारी आरोळी ठोकताच आम्ही पोरांनी नाइलाजास्तव तोंडे उघडली. कोयत्या – विळे हातात धरून आम्ही हात जोडले. आणि मी चुकतो की तू चुकतोस अशी एकमेकांची नेत्रपल्लवी चौकशी करीत आम्ही "देवाजीने करुणा केली।भाते पिकुनी पिवळी झाली।" असे जाहीर केले.

नाही म्हटले तरी येथपर्यंत सारे ठीक जमले. पुढे साक्षात लोकांसमोर, उघड्यावर पडलेल्या आम्ही स्टेजवरच्या पोरांनी घाबरून गीत लौकर आटोपण्याच्या दृष्टीने घाई केली. आम्ही पुढला चरण पकडून "तयार व्हा रे करू कापणी" अशी घाई केल्यामुळे "देवाजीच्या नावा घेऊनी" हे कर्तव्य आम्ही पार विसरलो. पण आपण स्टेजवरच आहो असे समजून पडद्यामागे पडलेली पोरे मात्र तेच कर्तव्य पार पाडत होती. त्यामुळे अनेक आवाज एकमेकांना भेदून गेले. आणि लढाई झाल्यासारखे वाटू लागले. तेव्हा बागाईतकर मास्तरांनी पुन्हा एकदा आपला कठोर आवाज चढवून सारे किरकोळ पिचके आवाज आपल्या नियंत्रणाखाली आणले. पुनः एकदा "देवाजीने करुणा केली!"

परंतु कमरेत वाकून हातातल्या कोयत्या सरसावीत जेव्हा आम्ही "खसाखसा मग विळा चालवा" असे म्हणून विळा चालवला तेव्हा माझा विळा लागून परशाच्या पंचाची कास सुटली. आणि प्रेक्षकांत हास्याची एक लाट उठली. पण परशा डरला नाही. त्याने उभ्याउभ्यानेच स्टेजवर पंचाची कास घातली. कास ठीकठाक बसवून तो पुनः "खसाखसा मग विळा चालवा" म्हणत वाकणार तोच "चूड कापुनी घाला अडवा" म्हणत आम्ही उभे राहिलो. त्या झटापटीत परशाच्या गालावर माझ्या विळ्याचा ओरखडा आला आणि भळकन रक्त सांडले. त्या वेदनेच्या भरात त्याने "हात भोसडीच्या" म्हणून मला एक शिवी हासडली. मी ओशाळून उभा राहिलो. मध्येच पळ काढावा आणि पडद्यात घुसावे असे वाटले. पण शक्य नव्हते. डझनभर तरी कोयत्या माझी हत्या करण्यासाठी तळपत होत्या. त्यामुळे नाकतोंड खाजवीत मी नुसता उभाच राहिलो. परशा रडवेल्या तोंडाने रक्त बोटाने पुशीत होता आणि बोट चोखीत होता. बोटातूनच रक्त येते आहे असा त्याचा समज झाला होता. आणि तरीही बाकीची पोरे मात्र "चूड कापुनी घाला अडवा" मध्येच दंग होती.

आमचे संग्रामी गाणे थांबत नाही, रक्ताची धार कमी होत नाही, आणि रक्त पुसलेली बोटे झपाझप चोखून परशा रक्त पोटात घेत नाही, हे पाहताच परशाचा बाप पितृप्रेमाने कळवळला. "अरे परशा – रगात... रगात..." म्हणत तो प्रेक्षकांतून उठला तो पुढे असलेल्या पोराबाळांच्या हातांवर, मांड्यांवर पाय देत तडक स्टेजवर चढला. ज्या पोरांचे सुटे अवयव चिरडले गेले ती पोरे केकाटून रडत उठली. तरी पर्वा न करता परशाचा बाप स्टेजवर चढला. त्यामुळे सर्वांनाच हालचाल करणे कठीण झाले. आमचे सर्वांचेच अंगविक्षेप थांबल्यामुळे आता पुढे काय करावे याचा अंदाज घेण्यासाठी आम्ही बावळटासाररखे पडद्यात पाहू लागलो. या भानगडीतून बागाईतकर मास्तर आम्हाला सोडवतील अशी आशा आम्हाला वाटत होती. पण त्यांचे

www.xtrapapers.com



लक्षच नव्हते.  डोळ्यांसमोर क्रमिक पुस्तक धरून गीत म्हणण्यात दंग झालेले हेडमास्तर आपल्या तंद्रीतून ओरडले, "कापा! कापा झटुनी सारे –"

"कापा... कापा!  काय कापा?"  परशाचा दांडगट बाप एकदम संतापाने किंचाळला, "भडव्यान्, कापलास तेवढा थोडा नाय झाला?"

तेव्हा कुठे बागाईतकर मास्तरांचे डोळे खाडकन उघडले.  त्यांनी भराभर शिट्टी फुंकली.  पण शिट्टीचा आवाजच आला नाही.  तेव्हा गडबडीत शिट्टीचे उलटे टोक तोंडात होते हे त्यांच्या लक्षात आले.  पण परशाचा बाप जबरदस्त.  नारळ भरल्यावर बारदान हलवून बंद करावे तशा सरावाने त्याने पडद्याची दोन्ही बाजूची दोन टोके पकडली आणि आख्खे स्टेज बारदान भरल्याप्रमाणे एकदम बंद करून टाकले.

*सारे प्रवासी घडीचे* – जयवंत दळवी, मॅजेस्टिक प्रकाशन, बारावी आवृत्ती (२००७)

– या उता-याच्या निवेदनशैलीविषयी काय म्हणता येईल ?

– या उता-यातील व्यक्तिरेखांच्या उपयोजनाबाबत चर्चा करा.

– या उता-यामध्ये विनोदनिर्मिती करण्यासाठी भाषा कशी उपयोगात आणली आहे ?

– वाचकांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी लेखकाने योजलेल्या पद्धतींबाबत काय म्हणता येईल ?

www.xtrapapers.com



**2.**

## अढळ सौंदर्य

तोच उदयाला येत असे सूर्य.
अहो क्षितिजावर त्याच नव्हे काय ?
तेच त्याचे कर न का कुंकुमाने
वदन पूर्वेचे भरिती संभ्रमाने ?

तेच तरु हे तैशाच पुष्पभार
लवुनि गेले दिसतात पहा सारे !
त्याच वल्ली तैसेच पुष्पहास्य
हसुनि आजही वेधिती या मनास !

कालचे जे की तेच आज पक्षी
कालच्या हो ज्या त्याच आज वृक्षी
बसुनि गाती कालची तीच गाने,—
गमे प्रातः प्रार्थना करिती तेणे !

काल जो का आनंद मला झाला
तोच आजही होतसे मन्मनाला ;
कालचा जो मी तोच हा असे का ?
अशी सहजच उद्भवे मनी शंका.

अशी सहजच उद्भवे मनी शंका
काय समजुनि समजले तुम्हाला का ?
असे अनुभव की-रिझवि एकदा जे
पुन्हा बहुधा नच रिझो त्याच चोजे.

पुन्हा बहुधा नच रिझो त्याच चोजे
कसे मग हे वेधिले चित्त माझे ––
आज फिरुनी या सूर्य-तरु-खगांनी
आपुलीया नवकान्ति-पुष्प-गानी ?

म्हणुनि कथितो निःशंक मी तुम्हाते, —
असे सुंदरता अढळ जरी कोठे
तर करी ती सृष्टीत मात्र वास ––
पहा मोहिल सर्वदा ती तुम्हास.

*केशवसुत काव्य आणि परामर्श,* संपा.रा.शं.वाळिंबे, विद्यामंदिर प्रकाशन (१९५८)

www.xtrapapers.com



– या कवितेतून कवीचा दृष्टिकोण कसा व्यक्त झाला आहे ?

– या कवितेतील मध्यवर्ती कल्पनांच्या आविष्कारासाठी कवीने केलेल्या भाषेच्या उपयोगाबाबत अभिप्राय द्या.

– या कवितेच्या रचनेविषयी काय म्हणता येईल ?

– वाचकांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी कवीने योजलेल्या पद्धतींबाबत काय म्हणता येईल ?